जा.क्र.न्याय शाखा/ 1528 /२०२५
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय
२ रा मजला, सास्मिरा इमारत,
सास्मिरा रोड, वरळी, मुंबई-४०० ०३०.
दिनांक-२५.०३.२०२५.

25 MAR 2025

| पहा - | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२५/ प्र.क्र.७/र.व.का-१, दि.१३.०१.२०२५. |
|---|---|

## परिपत्रक क्र. ६१७ /२०२५, दिनांक २५.०३.२०२५

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वर नमुद शासन निर्णयान्वये क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित केलेला आहे. सदर कृती आराखड्यानुसार नागरीकांना मिळणा-या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रलचित कामकाजाच्या पध्दतींचे पुनर्विलोकन करून प्रशासकीय कार्यपध्दतीमध्ये किमान दोन सेवा अतिशय सुलभ पध्दतीने द्याव्यात तसेच नागरीकांचे दैनंदिन जीवनमान सुकर व्हावे याकरीता सातत्याने प्रयत्न करावेत असे नमूद केलेले आहे. धर्मादाय संघटनेतील सर्व कार्यालयांत कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती मिळणेकामी मोठ्या प्रमाणात अर्ज केले जातात. विशेषतः बदल अर्ज व त्यावरील आदेशांच्या प्रमाणित प्रती मिळविण्यासाठी नागरीकांना वारंवार कार्यालयात यावे लागते.

सबब, बदल अर्ज व त्यावरील आदेश संकेतस्थळावर अपलोड केल्यास नागरीकांना त्यांच्या प्रमाणित प्रती घेण्यासाठी धर्मादाय कार्यालयात वारंवार येण्याची आवश्यकता पडणार नाही. त्यामुळे, धर्मादाय संघटनेत कार्यरत सर्व अधिका-यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम-२२ मधील प्रकरणात पारित केलेल्या बदल अर्जावरील आदेश/निर्णय व संपुर्ण परिशिष्ट-३ म्हणजेच निशाणी क्रमांक-१ (Exh.1) वर डिजिटल स्वाक्षरी करुन ते धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर अपलोड करावे. तसेच अशा रितीने अपलोड केलेल्या आदेश/निर्णयाच्या व परिशिष्ट-३/निशाणी क्रमांक-१ (Exh.1) च्या प्रती नागरीकांनी/पक्षकारांनी कोणत्याही कार्यालयीन कामकाजासाठी दाखल केल्यास त्या स्विकारण्यात याव्यात. नागरीक/पक्षकारांकडे आदेश/निर्णयाच्या प्रमाणित प्रती दाखल करण्याचा आग्रह धरू नये.

सदर परिपत्रकाचे सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी काटेकोरपणे पालन करावे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम -३ अन्वये निम्नस्वाक्षरीकारास प्रदान केलेल्या अधिकाराने जारी केलेले आहे.

25/03/25
(अमोघ श्या. कलोती)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
१.परिपत्रक धारिणी
२.सर्व संबंधित अधिकारी
३.संगणक शाखा(संकेतस्थळावर नोंदीसाठी)